प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. २७.६.२०२०**

# कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर टीपीएस-८, ९ व १० मध्ये सहभागी होणाऱ्या जमीन मालकांसाठी सिडकोतर्फे कागदपत्रे ऑनलाइन सादर करण्याची सुविधा

महाराष्ट्र शासनाने २०१७ मध्ये पनवेल तालुक्यातील २३ गावांसाठी अंतरिम विकास आराखडा मंजूर केलेल्या नैना क्षेत्रातील ३७ चौ. कि.मी. क्षेत्रासाठी सिडकोतर्फे ११ नगर रचना परियोजना (टीपीएस) निश्चित करण्यात आल्या आहेत. सदर ११ परियोजनांपैकी १० परियोजना या जनतेसाठी जाहीर करण्यात आलेल्या आहेत. तर ७ परियोजनांकरिता जमीन मालकांच्या सभांचे आयोजनही करण्यात आलेले आहे.

टीपीएस-१ (१९.११ हे.) करीताच्या प्रारंभिक योजनेस महाराष्ट्र शासनातर्फे यापूर्वीच मंजुरी देण्यात आली आहे. टाळेबंदी संपुष्टात आल्यावर जमीन मालकांना अंतिम भूखंड हस्तांतरित करावयाची प्रक्रिया सुरु करण्यात येईल. टीपीएस-२ (१९५ हे.) आणि टीपीएस-३ (४३४ हे.) करीताच्या मसुदा योजनांस राज्य शासनातर्फे मंजुरी देण्यात आली असून रस्तांच्या कामासही लवकरच प्रारंभ करण्यात येईल. टीपीएस-४ आणि टीपीएस-५ करीता जमीन मालकांच्या सभा फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये पार पाडण्यात आल्या. टाळेबंदीच्या काळात एप्रिल २०२० च्या अखेरीस टीपीएस-६ करीता जमीन मालकांची सभा डिजिटल माध्यमातून पार पाडण्यात आली आणि संचालक नगर रचना, पुणे यांना सल्लामसलतीसाठी सादर करण्यात आलेली आहे. टीपीएस-७ करीता जमीन मालकांची सभा नुकतीच जून २०२० मध्ये प्रत्यक्ष व डिजिटल अशा दोन्ही प्रकारे पार पाडण्यात आलेली आहे .

अंतरिम विकास आराखड्यातील उर्वरित क्षेत्रासाठी सिडकोतर्फे टीपीएस-८, टीपीएस-९ आणि टीपीएस-१० जाहीर करण्यात आल्या आहेत. टीपीएस-८ मध्ये चिखले, बेलवली, पाली खुर्द आणि मोहो या गावातील काही भागाचा समावेश आहे. टीपीएस-९ मध्ये बेलवली, सांगडे, चिखले, कोन

व बोर्ले या गावातील काही भागाचा तर टीपीएस-१० मध्ये शिवकर, चिखले, कोल्हे, कोन व देरावली या गावातील काही भागाचा समावेश आहे. सदर योजनांचा उद्देश घोषणेचा नकाशा व राजपत्रातील अधिसूचना https://cidco.maharashtra.gov.in/naina या सिडकोच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

टीपीएस-८, ९ व १० मध्ये सहभागी होणाऱ्या जमीन मालकांनी कृपया आपला संपर्क तपशील (**पत्ता व मोबाइल क्र.**), **आधार कार्ड/पॅन कार्ड** यांची प्रत, जिल्हाधिकाऱ्यांकडून देण्यात आलेल्या विकास परवानगीची प्रत, गट बुक/हिस्सा क्रमांक दर्शविणारा मोजणी नकाशा सिडको कार्यालयात सादर करावेत आणि संयुक्त मालकी असलेल्या जमीन मालकांनी तसेच अनेक जमीन मालक एकत्र भूखंड मिळवू इच्छित असल्यास अशा जमीन मालकांनी **एकत्र भूखंड देण्याबाबतचे संमतीपत्र** सिडको कार्यालयात सादर करावेत. उपरोक्त सर्व माहिती सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत नैना कार्यालयात सादर करावेत. जेणेकरून योजनेचा आराखडा तयार करतेवेळी सदर बाब विचारात घेता येईल.

सध्या कोविड-१९ च्या महासाथीमुळे देशभर उद्भवलेल्या परिस्थितीचा विचार करून सिडकोच्या नैना विभागाने जमीन मालकांना उपरोक्त कागदपत्रे सिडकोच्या कार्यालयास भेट न देता, ई-मेलद्वारे ऑनलाइन सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. उपरोक्त माहिती संबंधित परियोजनेसाठी खाली दिलेल्या पत्त्यावर ई-मेल द्वारे सादर करावीत.

| | |
|---|---|
| **टीपीएस-८** | tps8@cidcoindia. com |
| **टीपीएस-९** | tps9@cidcoindia. com |
| **टीपीएस-१०** | tps10@cidcoindia. com |

उपरोक्त माहिती नैना कार्यालयास सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत सादर करावी.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा.संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धी देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**